**राजाराम महाविद्यालयात रोजगार व कौशल्ये विषयावरील एक दिवसीय कार्यशाळा संपन्न**






कोल्हापूर :

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या **अग्रणी महाविद्यालय योजना** अंतर्गत **प्लेसमेंट सेल व रसायनशास्त्र विभाग, राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर** यांच्या संयुक्त विद्यमाने *"Shaping Tomorrow: Careers, Skills & Transitions for Viksit Bharat"* या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन **दिनांक १६ डिसेंबर २०२५ रोजी राजर्षी शाहू सभागृहात** करण्यात आले.

कार्यशाळेचे उद्घाटन **डॉ. व्ही. एम. पाटील**, माननीय प्राचार्य, द न्यू कॉलेज, कोल्हापूर यांच्या शुभहस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी **डॉ. अनिता जे. बोडके**, माननीय प्राचार्या, राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर उपस्थित होत्या. यावेळी **डॉ. आर. ए. कडकणे**, समन्वयक, अग्रणी महाविद्यालय योजना यांनीही उद्घाटन समारंभास उपस्थिती दर्शविली.

सदर कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांतील करिअर संधी, रोजगारक्षम कौशल्ये, करिअर ट्रान्झिशन तसेच बदलत्या व्यावसायिक गरजांशी जुळवून घेण्याबाबत मार्गदर्शन करणे हा होता. कार्यशाळेचा आशय **विकसित भारत 2047** व **राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020** यांच्या अनुषंगाने निश्चित करण्यात आला होता.

कार्यशाळेत तीन सत्रांचे आयोजन करण्यात आले. पहिल्या सत्रात **डॉ. राजन पडवळ**, माजी प्रशिक्षण व रोजगार अधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी विविध क्षेत्रांतील करिअर संधींबाबत मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात **श्री. अभयकुमार माने**, संचालक, I-Pro Tech, कोल्हापूर यांनी करिअर ट्रान्झिशन व डोमेन बदलाची गरज स्पष्ट केली. तिसऱ्या सत्रात **डॉ. गजानन राशीनकर**, माजी TPO यांनी यशस्वी करिअरसाठी आवश्यक रोजगारक्षम कौशल्यांवर सखोल मार्गदर्शन केले.

कार्यशाळेचे आयोजन **श्री. अनिल मरळे**, समन्वयक, प्लेसमेंट सेल (संयोजक) व **डॉ. के. के. पाटील**, प्रमुख, रसायनशास्त्र विभाग (सह-संयोजक) यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडले. विविध महाविद्यालयांतील तसेच आपल्या महाविद्यालयातील मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

समारोपप्रसंगी अध्यक्षीय भाषण, आभार प्रदर्शन व कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. सदर कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक, मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरली.